नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज़

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३३५ Issue - 335 | वार रविवार दि. २६ एप्रिल २०२६ Blow- Monday Date 26 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून राज्य दुष्काळमुक्त करणार

## 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत दिमाखदार शुभारंभ; जलसंवर्धनाचा जागर करत अहिल्यादेवींना अनोखी मानवंदना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक (जिमाका वृत्तसेवा) : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे भव्य शुभारंभ झाला. नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून राज्याला दुष्काळमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून येत्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने निर्मळ आणि अविरल गोदावरीसाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

अहिल्यादेवींचे विचार, वारसा आणि विकास हा त्रिसूत्री मंत्र घेऊन ही यात्रा सुरू झाली आहे. कार्यक्रमाला राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, इंदूर संस्थानचे श्रीमंत युवराज महाराज यशवंतराव होळकर, अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठाचे पीठाधीश परम पूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे, नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर आदी उपस्थित होते.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, वेदात नदीचे माहात्म्य वर्णन केले असून नदीला आई मानले आहे. नदी स्तुतीसुक्तात ऋषींमुनींनी नदीच्या उपयुक्ततेचे वर्णन केले आहे. वारशाचे संवर्धन आणि विकास याचा समन्वय देशाच्या उज्वल भवितव्यासाठी आवश्यक आहे. म्हणूनच अहिल्यादेवींच्या विचाराच्या आधारे भविष्यातील विकासाची दिशा दाखविण्यासाठी या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. गोदावरी नदी महाराष्ट्रासह आंध्रप्रदेशासाठी महत्वाची असल्याने ती बारमाही प्रवाहित राहावी यासाठीदेखील प्रयत्न सुरू आहेत, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जलव्यवस्थापनातील योगदानाचे स्मरण केले. ते म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांनी घाट, बारव यांची निर्मिती करतांना अध्यात्मिकता आणि उपयुक्तता याचा समन्वय साधला. पाण्याचे महत्व लक्षात घेऊन जलव्यवस्थापनावर भर दिला. त्यांनी निर्माण केलेले बारव आजही सुस्थितीत असून त्याचे संवर्धन राज्य शासन करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. अहिल्यादेवी होळकर यांनी नद्यांचे महत्व जाणले आणि नदी प्रदूषण रोखण्याचे प्रयत्न केले. महिला, गरीब आदिवासीना समाजाच्या मुख्य धारेत आणण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांचे विचार आजही महत्वाचे आणि मार्गदर्शक असून छत्रपती शिवाजी महाराज आणि अहिल्यादेवी यांच्यासारख्या महान व्यक्तींच्या विचारांच्या आधारेच शाश्वत विकास साधता येईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, त्र्यंबकेश्वर आणि चोंडी येथून दोन यात्रा सुरू होत असून मध्य प्रदेशातील माहेश्वर येथे नर्मदातीरी समारोप होणार आहे. राज्यातील ३० नदीखोऱ्यांतील पाणी कलशांच्या माध्यमातून नर्मदेला अर्पण करण्यात येईल. गोदावरी आणि नर्मदेचे महात्म्य लक्षात घेऊन आणि विचार, वारसा आणि विकास ही त्रिसुत्री घेऊन यात्रेच्या माध्यमातून जलसंवर्धनाचा संदेश देण्यात येणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी केलेले जलसंवर्धनाचे कार्य जनतेत रुजविण्याचा प्रयत्न या यात्रेद्वारे करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. नागरिकांनी या यात्रेत सहकार्य करावे असे आवाहनही श्री. विखे पाटील यांनी केले.

आण्णासाहेब मोरे म्हणाले, जलसाक्षरतेचे विचार सेवेकऱ्यांमार्फत पोहोचविण्यात येत आहेत. गुरुपिठाच्या माध्यमातून नदी स्वच्छता उपक्रम राबविण्यात येत आहेत. देशाच्या विकासासाठी थोरामोठांचे विचार भारतभर पोहोचविण्याचे काम करावे लागतील. संस्कृती, संस्कार केले तर देश बलशाली आणि विकसित होईल. नवीन पिढीने निर्व्यसनी राहून देशाचे संस्कारदूत बनावे, असे आवाहन त्यांनी केले. मुख्यमंत्र्यांच्या आगमनाने कुंभमेळ्याच्या कामांना अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करून कुंभमेळ्यात गर्दीचे नियोजनाबाबत त्यांनी सूचना केल्या.

युवराज होळकर म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांनी जलव्यवस्थापनाची सुरुवात नर्मदा येथे केली. जलसाक्षरता आणि जलव्यवस्थापन ही काळाची गरज आहे. गोदावरी आणि नर्मदेला जोडून 'एक भारत श्रेष्ठ भारत'चा संदेश दिला जाणार आहे. गोदावरी महाराष्ट्राची तर नर्मदा मध्यप्रदेशची जीवनधारा आहे. जन्मभूमी ते कर्मभूमी जलयात्रेचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानले. अहिल्यादेवींनी सुरू केलेली फड पद्धती उपयुक्त असून ती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या हस्ते कुशावर्तातील जलकलश मुख्यमंत्री फडणवीस यांना सुपूर्द करण्यात आला आणि राज्यातील ३० नदीखोऱ्यांतील पाणी कलशांच्या माध्यमातून आणून त्याचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. केदार कंठशिखर वयाच्या सहाव्या वर्षी सर करणाऱ्या चिमुकल्या मनकर्णिका देशपांडे हिचा सत्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. 'गोदा ते नर्मदा जलयात्रा २०२६' या गीताचे विमोचन आणि उन्नत नाशिक अभियानाच्या बोधचिन्हाचे अनावरण मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमापूर्वी श्री. विखे पाटील यांनी सपत्नीक १०८ कन्यकांचे पूजन केले.

कार्यक्रमाला माजी मंत्री रवींद्र चव्हाण, सदाभाऊ खोत, आमदार गोपीचंद पडळकर, राहुल आहेर, सीमा हिरे, देवयानी फरांदे, हिरामण खोसकर, दिलीप बनकर, विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम, मंत्री विखे पाटील यांच्या पत्नी शालिनीताई विखे पाटील, नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, ह.भ.प.संजय नाना धोंगडे, महंत उद्धव महाराज मंडलिक, मंदाकिनी मोरे, महामंडलेश्वर रामचंद्रदास मोरे, उपमहापौर विलास शिंदे आदी उपस्थित होते. 'जल व्यवस्थापन कृती पंधरवड्या' अंतर्गत आयोजित या जलयात्रेचा मुख्य उद्देश राज्यातील जलस्त्रोतांबाबत जनजागृती करणे, लोकसहभाग वाढवणे आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनाची संकल्पना अधिक बळकट करणे हा आहे. ही जलयात्रा २५ एप्रिल ते २९ एप्रिल या कालावधीत महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील विविध जिल्ह्यांतून प्रवास करणार आहे. यात्रेत सुमारे ५०० जलयात्री, वारकरी आणि तरुण सहभागी झाले आहेत.

# इस्लामाबाद चर्चा अनिर्णित, इराणचे परराष्ट्रमंत्री चर्चा न करताच परतले, अमेरिकेचा पाकिस्तान दौरा रद्द

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इस्लामाबाद : अमेरिका आणि इस्रायलने २८ फेब्रुवारी २०२६ रोजी इराणवर हवाई हल्ले सुरू केले आणि पश्चिम आशियात युद्धाला सुरुवात झाली. हे युद्ध थांबण्याची शक्यता पुन्हा एकदा धूसर झाली आहे. इराणने अमेरिकेशी थेट चर्चा करणार नाही, असे जाहीर केले आहे. पाकिस्तानच्या माध्यमातून वाटाघाटी करू अशी भूमिका जाहीर केल्यानंतर इराणकडून परराष्ट्रमंत्री अराघची पाकिस्तानमध्ये पोहोचले. पण होर्मुझच्या प्रश्नावर तोडगा निघाला नाही. अखेर अराघची यांनी इराणला परत जाण्याचा निर्णय घेतला. तर अमेरिकेच्या प्रतिनिधींनी त्यांचा पाकिस्तान दौराच रद्द केला.




इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघच यांच्या नेतृत्वात इराणचे शिष्टमंडळ वाटाघाटीसाठी पाकिस्तानमध्ये पोहोचले. शिष्टमंडळ पाकिस्तानसोबत विविध मुद्यांवर चर्चा करत होते. पण होर्मुझच्या प्रश्नावर समाधानकारक तोडगा निघू शकला नाही. अखेर इराणच्या शिष्टमंडळाने मायदेशी रवाना होण्याचा निर्णय घेतला. इराणचे शिष्टमंडळ पाकिस्तानमधून परत जात असल्याचे कळल्यामुळे अमेरिकेच्या प्रतिनिधींनी त्यांचा पाकिस्तान दौराच रद्द केला आहे. इराण - अमेरिका एकमेकांशी थेट बोलण्यास तयार नाही. होर्मुझच्या प्रश्नावर दोन्ही देशांचे समाधान होईल असा तोडगा निघणे कठीण झाले आहे. यामुळे युद्ध थांबण्याची शक्यता परत एकदा धूसर झाली आहे. याआधी इराणचे शिष्टमंडळ शनिवारी पाकिस्तानमध्ये पोहोचले. इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांची भेट घेतली. या बैठकीला पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री इशाक दार आणि लष्करप्रमुख जनरल सय्यद आसिम मुनीर हे पण उपस्थित होते.

# बाबा बुवांनी अधात्म सांगावं, मनाला वाटेल तसा इतिहास सांगू नये; छत्रपती संभाजीराजेंचा धीरेंद्र शास्त्रींना इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर : बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदासांसंबंधी केलेल्या वक्तव्यावरुन चांगलाच वाद रंगल्याचं चित्र आहे. माजी खासदार छत्रपती संभाजीराजे यांनी धीरेंद्र शास्त्री यांच्या या वक्तव्याचा समाचार घेतला. बाबा बुवांनी अध्यात्म सांगावं, मनाला वाटेल तसा इतिहास सांगू नये असं संभाजीराजे म्हणाले. तसचे अध्यात्म आणि इतिहास यांची सरमिसळ करून त्याची अहवेलना करू नये असंही ते म्हणाले.

बुवा बाबांनी अध्यात्म सांगावे. मनाला वाटेल तसा इतिहास सांगत बसू नये. हिंदू धर्माच्या अध्यात्माची आणि इतिहासाची उंची अत्युच्च आहे. त्याची वाटेल तशी आणि चुकीच्या पद्धतीची सरमिसळ करून अध्यात्माची आणि इतिहासाची अवहेलना करू नये.

नागपुरात जामठा इथे एका कार्यक्रमात बोलताना बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि रामदास स्वामी यांचे संबंध गुरूशिष्याचा असल्याचा दावा करत त्यांच्या नात्याचा एक किस्सा सांगितला. शिवाजी महाराज युद्ध करून थकले तेव्हा एक दिवस ते समर्थ रामदास स्वामींकडे गेले आणि आपला मुकूट उतरवून रामदास स्वामींना दिला. आता हे राज्य तुम्ही सांभाळा अशी विनंती केली. त्यावर रामदास स्वामींनी हसून मी राज्य चालवतो, तुम्ही अंमलबजावणी करा असं म्हटलं असा दावा धीरेंद्र शास्त्रींनी केला.



तसंच हिंदूंनी चार मुलं जन्माला घालावी आणि एकाला आरएसएसचा स्वयंसेवक करावा असं आवाहनही हिंदू समाजाला केलं. जगातील पहिले भारतदुर्गा मंदिरा भव्य शिलान्यास सोहळा शुक्रवारी पार पडला. या कार्यक्रमात धीरेंद्र शास्त्रींनी हे वक्तव्य केलं.

धीरेंद्र शास्त्रींच्या वक्तव्यानंतर काँग्रेसने आक्रमक पवित्रा घेतला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी यावर पत्रकार परिषद घेतली. त्यांनी धीरेंद्र शास्त्रींच्या वक्तव्याचा समाचार घेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरही निशाणा साधला. सोबतच मुख्यमंत्री फडणवीस आणि संघाने जाहीर माफी मागावी, अशी मागणीही केली. तर भाजपकडून छत्रपती शिवरायांचा इतिहास बदलण्याचा प्रयत्न होत आहे आणि हा मनुवादी विचारसरणीचा कट असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी केला. शिवराय थकले आणि राजपाट समर्थांकडं दिला, हे धीरेंद्र शास्त्री यांचं विधान अत्यंत संतापजनक आहे. अशी विधानं करून महाराष्ट्राच्या संत परंपरेला आणि विचारांना गालबोट लावण्याचा प्रयत्न असल्याची टीका आमदार रोहित पवारांनी केली. तर धीरेंद्र शास्त्रींच्या वक्तव्यावरून आमदार अमोल मिटकरींनी हल्लाबोल केला.

## आयएमडीतर्फे उष्णतेच्या लाटेबाबत सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना जारी

# पुढील सात दिवस अनेक भागांमध्ये उष्णतेच्या लाटेची स्थिती कायम राहण्याची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : देशाच्या अनेक भागांमध्ये सतत वाढणारे तापमान आणि सरासरीपेक्षा जास्त उष्ण हवामान पाहता, पृथ्वी विज्ञान मंत्रालयांतर्गत येणाऱ्या भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) उष्णतेच्या लाटेबाबत सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे आणि सूचना जारी केल्या आहेत.

येत्या काही दिवसांत जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरयाणा, चंदीगढ आणि दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान तसेच मध्य भारताच्या काही भागांत उष्णतेची लाट निर्माण होण्याची दाट शक्यता असल्याचे हवामान विभागाने सूचित केले आहे. त्याच वेळी, किनारपट्टी आणि पूर्वेकडील राज्यांमध्ये उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे, तर उत्तर भारताच्या काही भागांत रात्रीचे तापमान अधिक राहण्याची शक्यता असून, त्यामुळे जीवाची काहिली आणि आरोग्यविषयक तक्रारी जाणवण्याचा धोका वाढू शकतो.

वायव्य भारतात २७ एप्रिल पर्यंत कमाल तापमानात कोणताही मोठा बदल होणार नाही आणि त्यानंतर तापमानात हळूहळू घट होईल. तर मध्य आणि इतर भागांमध्ये या काळात तापमानात सुरुवातीला वाढ आणि त्यानंतर घट दिसून येऊ शकते, असाही अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.



एकंदर परिस्थिती लक्षात घेता, उष्णतेच्या लाटेपासून सुरक्षित राहण्यासाठी भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत आणि नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचा सल्ला दिला आहे. यामध्ये थेट सूर्यप्रकाशात जास्त वेळ राहणे टाळणे, विशेषतः दुपारच्या वेळी पुरेसे पाणी पिणे, हलके आणि सुती कपडे घालणे आणि उच्च तापमानाच्या काळात घराबाहेरील कष्टाची कामे टाळणे यांचा समावेश आहे. लहान मुले, वृद्ध आणि आधीपासूनच आरोग्याच्या समस्या असलेल्या व्यक्तींना विशेष काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

उष्णतेशी संबंधित आजार, जसे की उष्णतेमुळे येणारा थकवा आणि उष्माघाताचा धोका कमी करण्यासाठी वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, यावर भारतीय हवामान विभागाने भर दिला आहे. आयएमडीच्या अंदाजानुसार, पुढील सात दिवस अनेक भागांमध्ये उष्णतेच्या लाटेची स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे.

विशेषतः खालील भागांमध्ये ही स्थिती असेल: वायव्य भारत (पंजाब, हरियाणा, दिल्ली, राजस्थान, उत्तर प्रदेश); मध्य भारत (मध्य प्रदेश, छत्तीसगड, विदर्भ); दक्षिणेकडील निवडक प्रदेश (केरळ आणि माहे) याव्यतिरिक्त, ओदिशा, पश्चिम बंगाल, तमिळनाडू आणि आंध्र प्रदेश यांसारख्या किनारपट्टीवरील राज्यांमध्ये उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे. उत्तरेकडील प्रदेशांमध्ये रात्रीच्या वेळीही उष्ण वातावरण कायम राहू शकते, ज्यामुळे रात्रीच्या वेळी जाणवणारा उष्म्याचा त्रास वाढण्याची शक्यता आहे.

भारतीय हवामान विभागाच्या हंगामी अंदाजानुसार, एप्रिल ते जून २०२६ दरम्यान पूर्व, मध्य आणि वायव्य भारताच्या काही भागांत, तसेच आग्नेय द्वीपकल्पीय प्रदेशात सामान्यपेक्षा अधिक उष्णतेच्या लाटेची शक्यता आहे; यामुळे सध्या सुरू असलेल्या उष्ण हवामानाच्या वातावरणात, नियमित खबरदारी घेण्यासह उपाययोजनांची आवश्यकता प्रामुख्याने आहे.

भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) उष्णतेच्या लाटेबाबतची सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वे अधिकृत संकेतस्थळावर (र्हीींिः// ारीीरा.ळाव.र्सेीं.ळप/ीशीेीिीर्ळीीश/ हशरींींशर्सीीळवरपलश.िहि) जनतेच्या माहितीसाठी आणि प्रसारासाठी उपलब्ध करून दिली आहेत. यामध्ये, काय करावे आणि काय करू नये, पूर्वतयारीच्या उपाययोजना आणि विविध क्षेत्रांसाठीच्या विशेष सूचनांचा समावेश आहे. या मार्गदर्शक तत्त्वांचा उद्देश व्यक्ती, समुदाय आणि स्थानिक प्रशासनांना आरोग्याशी संबंधित धोके कमी करण्यात आणि उष्णतेच्या तीव्र परिस्थितीचा सामना करण्याची क्षमता वाढवण्यात मदत करणे हा आहे.


भारतीय हवामान विभाग तापमानातील बदलांवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि वेळीच हवामानाचे अंदाज व इशारे जारी करत आहे. त्यामुळे नागरिकांना अधिकृत स्रोतांद्वारे अद्ययावत राहण्याचा आणि दिलेल्या सुरक्षा उपायांचे पालन करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# काही माणसं मार्ग बदलतात; तर काही मार्ग माणसं बदलतात!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माणसाचं आयुष्य म्हणजे सरळ रेषेतली वाट नसते. ती वळणांनी, चढ-उतारांनी, काटेरी वळचणींनी भरलेली असते. कुणी त्या वाटेवर चालताना स्वतःचा मार्ग बदलतो; तर कुणाचं संपूर्ण व्यक्तिमत्त्वच त्या मार्गामुळे बदलून जातं. म्हणूनच जीवनाचं एक कटू पण खरं सत्य असं सांगतं, काही माणसं मार्ग बदलतात; तर काही मार्ग माणसं बदलतात. हा फरक समजून घेतला, तर माणसाचं आयुष्यही समजायला लागतं. काही माणसं परिस्थितीवर मात करतात. संकट आलं, अडथळे आले, अपयश आलं तरी ते थांबत नाहीत. ते विचार करतात, आत्मपरीक्षण करतात आणि म्हणतात, हा मार्ग माझ्यासाठी योग्य नाही; मला दुसरी वाट शोधायची आहे. ही माणसं पळपुटी नसतात; ती प्रगल्भ असतात. कारण मार्ग बदलणं म्हणजे हार मानणं नव्हे, तर स्वतःला वाचवणं असतं. स्वतःच्या मूल्यांशी, स्वप्नांशी आणि अंतःकरणाशी प्रामाणिक राहण्यासाठी घेतलेला तो एक धाडसी निर्णय असतो.

इतिहासात अशी असंख्य उदाहरणं आहेत. अपयशातून उभे राहिलेले उद्योजक, अन्यायाला कंटाळून व्यवस्थेविरुद्ध उभे ठाकलेले समाजसुधारक, चुकीच्या वाटेवरून परत फिरलेले सामान्य माणूस या सगळ्यांनी मार्ग बदलला; पण स्वतःला हरवू दिलं नाही. पण प्रत्येकाला मार्ग बदलता येतोच असं नाही. सगळ्यांकडे पर्याय नसतात. सगळ्यांकडे बळ नसतं. सगळ्यांकडे पाठिंबा नसतो. मग काही माणसं मार्ग बदलत नाहीत; मार्गच त्यांना बदलून टाकतो. दारिद्र्य, बेरोजगारी, सामाजिक अन्याय, कौटुंबिक जबाबदाऱ्या, व्यसन, सत्ता, पैसा हे सगळे मार्ग माणसाच्या आयुष्यावर आपला ठसा उमटवतात. एक संवेदनशील माणूस हळहळू कठोर होतो. एक प्रामाणिक माणूस तडजोडी शिकतो. एक आदर्शवादी माणूस वास्तववादी बनतो, कधी कधी तर निराशावादीही. हा बदल नेहमी स्वेच्छेने होत नाही; तो अनेकदा परिस्थितीने लादलेला असतो. मार्ग माणसाला कधी मोडतो, तर कधी घडवतो. प्रत्येक मार्ग वाईट नसतो. काही मार्ग माणसाला मजबूत करतात.




संघर्षाची वाट चाललेला माणूस सहनशील होतो. अपमान सहन केलेला माणूस संवेदनशील होतो. कठीण परिस्थितीत तग धरलेला माणूस नेतृत्व शिकतो पण काही मार्ग माणसाला आतून तोडतात. निरंतर अपमान, अन्याय, उपेक्षा, असुरक्षितता यामुळे माणूस स्वतःवरच विश्वास ठेवणं सोडतो. मग तो जगण्यासाठी बदलतो; पण तो बदल त्याचा नसतो, तर तो लादलेला असतो. आजचा समाज कोणते मार्ग तयार करतोय? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. आजचा समाज माणसाला कोणत्या वाटेवर ढकलतो आहे? स्पर्धेची वाट, जिथे माणूस माणसाचा प्रतिस्पर्धी आहे. स्वार्थाची वाट, जिथे मी केंद्रस्थानी आहे. दिखाव्याची वाट, जिथे सत्यापेक्षा प्रतिमा महत्त्वाची आहे. तडजोडीची वाट, जिथे मूल्यांपेक्षा सोयी जड ठरतात. या वाटांवर चालताना अनेक माणसं नकळत बदलून जातात. ते स्वतःला ओळखू शकत नाहीत. आरशात दिसणारा चेहरा त्यांचाच असतो; पण आतला माणूस कुठेतरी मागे पडलेला असतो.

मार्ग बदलणं ही ताकद आहे, कमकुवतपणा नाही. समाज अनेकदा मार्ग बदलणाऱ्याला दोष देतो. स्थिर नाही, कायम बदलतो, टिकाव नाही अशी लेबले लावली जातात पण सत्य असं आहे की चुकीच्या मार्गावर ठाम राहणं हे धैर्य नाही; ते हट्ट आहे. वेळीच वळण न घेणं म्हणजे अपघाताला आमंत्रण देणं. मार्ग बदलणं म्हणजे स्वतःच्या आयुष्याची जबाबदारी स्वीकारणं. ते धाडस सगळ्यांकडे नसतं. शेवटी प्रश्न मार्गाचा नाही, माणसाचा आहे. मार्ग बदलणं की मार्गाने बदलणं हा शेवटी निवडीचा प्रश्न आहे. माणूस जागरूक असेल, आत्मभान जपेल, प्रश्न विचारेल, तर तो मार्ग बदलू शकतो. पण जर तो गप्प राहिला, सवयींचा गुलाम झाला, तर मार्ग त्याला बदलतो कधी नकळत, कधी निर्दयपणे. म्हणूनच प्रत्येक वळणावर थांबून स्वतःला विचारणं गरजेचं आहे. हा मार्ग मला घडवतोय की मोडतोय? मी बदलतोय कारण मला वाढायचं आहे, की कारण मला तग धरायचा आहे?

आयुष्याच्या वाटेवर चालताना सगळ्यांनाच वळणं येतात. कोणी त्या वळणावर दिशा बदलतो, तर कोणी तिथेच स्वतः बदलून जातो. पण ज्यांनी स्वतःची ओळख जपली, मूल्यांना धरून ठेवलं आणि गरज पडल्यावर मार्ग बदलण्याचं धैर्य केलं, तेच खऱ्या अर्थाने जिंकतात. कारण शेवटी एवढंच खरं आहे की, मार्ग सगळ्यांनाच बदलतो; पण स्वतःला हरवू न देता मार्ग बदलणं, हीच खरी माणूसपणाची कसोटी आहे.



**– प्रवीण बागडे, नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

# मेळघाट हाट : दुर्गम भागातील महिलांच्या उत्पादनांना मिळाले हक्काचे व्यासपीठ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट क्षेत्रातील दुर्गम भागात राहणाऱ्या स्वयंसहाय्यता महिला बचतगटांच्या श्रमाला आणि त्यांच्या कौशल्यातून साकारलेल्या उत्पादनांना 'मेळघाट हाट' विक्री केंद्राच्या माध्यमातून हक्काचे व्यासपीठ प्राप्त झाले आहे. महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सशक्तीकरणासाठी राबविण्यात आलेल्या अशा अभिनव उपक्रमांना सर्व स्तरावरून प्रोत्साहन मिळत आहे. जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्हा परिषद, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती येथे सायन्सकोर प्रांगणालगत आधुनिक महिला बचत गट उत्पादन विक्री केंद्र सुरु आहे. हे विक्री केंद्र ५ जानेवारी २०२५ पासून नागरिकांच्या सेवेत आहे.

मेळघाट हाटच्या माध्यमातून आदिवासी क्षेत्रातील उत्पादित साहित्याला प्रथमच शहराच्या मध्यवस्तीत हक्काचे विक्री केंद्र मिळाले आहे. या मॉलच्या माध्यमातून उत्पादित वस्तूंची थेट ग्राहकांना विक्री होत असल्याने मध्यस्थांची साखळी मोडीत निघत असून बचत गटातील महिलांच्या उत्पन्नात विशेष वाढ होत आहे. या ठिकाणी ग्राहकांसाठी मेळघाटातील वैविध्यपूर्ण वनौषधी, बांबूपासून बनविलेल्या कलाकुसरीच्या वस्तू, रानमेवा आणि शुद्ध मध यासारख्या दुर्मिळ वस्तूंची मोठी श्रेणी खरेदीसाठी उपलब्ध आहे. आदिवासी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला बचत गटांना सातत्याने प्रोत्साहन देऊन आदिवासी क्षेत्रात जास्तीत-जास्त बचत गटांचे जाळे निर्माण करणे हे प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. महिलांची कला-कौशल्याला योग्य दिशा मिळावी तसेच ग्राहकांच्या मागणीनुसार उत्पादनात वैविध्य आणून त्यांना मोठी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी मेळघाट हाटची निर्मिती करण्यात आली आहे.

विक्रीसाठी आणलेल्या साहित्यांना राष्ट्रीय स्तरावर योग्य भाव मिळण्यासाठी विक्री साहित्याचे उत्तम मार्केटिंग, आकर्षक पॅकिंग व प्रभावी ब्रँडिंग करणे ही काळाची गरज आहे. हीच बाब लक्षात घेऊन महिला बचत गटांना या तांत्रिक बाबींचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उत्पादित मालाला राज्यासह संपूर्ण देशात बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनामार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. मेळघाटातील धारणी तसेच चिखलदरा तालुक्यातील स्वयंसहाय्यता महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला कायमस्वरूपी बाजारपेठ मिळावी, याच हेतूने हे मेळघाट हाट विक्री केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राचे वैशिष्ट्य म्हणजे येथे एकाच छताखाली मेळघाटातील ४७ प्रकारच्या विविध वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत. प्रथम टप्प्यात एकूण ६० स्वयंसहाय्यता महिला बचत गटांच्या उत्पादनांचा यात समावेश करण्यात आला होता. त्यामध्ये प्रामुख्याने बांबूपासून निर्मित विविध उत्पादने, तृणधान्यांमध्ये सावा, कुटकी, ज्वारी, बाजरी तसेच कडधान्य, गहू, लाल तांदूळ, तूर दाळ, विविध प्रकारची लोणची, चिखलदऱ्याची जगप्रसिद्ध कॉफी, मध आणि शुद्ध तूप यांचा समावेश आहे. याशिवाय गृहशोभेच्या वस्तू आणि आरोग्याच्या दृष्टीकोनातून पौष्टिक खाद्यान्ने देखील येथे उपलब्ध आहेत. या केंद्राला आधुनिक मॉलचे स्वरूप देण्यात आले असून, येथे स्वतंत्र गोदाम, पॅकेजिंग आणि लेबलिंग युनिटची व्यवस्था करण्यात आली आहे, ज्यामुळे ग्राहकांना खरेदीचा एक वेगळा अनुभव मिळत आहे.

खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त मेळघाट हाट येथे 'खादी महोत्सवा'चेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी कस्तुरबा सोलर खादी महिला समिती अंतर्गत धारणी तालुक्यातील महिलांनी कापसापासून सूत आणि सुतापासून कापड ते गारमेंटपर्यंतच्या उत्पादनांची निर्मिती करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या क्लस्टरतर्फे महिलांनी उत्पादीत केलेला माल खादी महोत्सवात विक्रीसाठी ठेवण्यात आला होता. विकेंद्रित सोलर चरखा समूहाच्या कार्यक्रमांतर्गत लाभार्थी महिलांनी तयार केलेली दर्जेदार खादी आणि सौर खादी उत्पादने येथे सवलतीच्या दरात नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली होती, ज्याला अमरावतीकरांचा चांगला प्रतिसाद मिळाला. प्रशासनाच्या या अभिनव उपक्रमामुळे मेळघाटातील आदिवासी महिला भगिनींच्या बचत गटांना विक्री आणि विपणनासाठी एक सक्षम प्लॅटफॉर्म मिळाला असून, यामुळे महिला सक्षमीकरणासह आदिवासी क्षेत्रातील आर्थिक विकासाला निश्चितच मोठी गती मिळणार आहे.

**– अपर्णा यावलकर**
**माहिती अधिकारी,**
**जिल्हा माहिती कार्यालय,**
**अमरावती**

# धुळे व नंदुरबार जिल्हे भविष्यातील प्रमुख औद्योगिक केंद्रे बनणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

- **शिरपूरला स्व. तपनभाई पटेल मेमोरिअल हॉस्पिटलसह विविध विकासकामांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन**
- **शिरपूर येथे औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी पुढाकार घेण्याचे मुख्यमंत्र्यांचे आश्वासन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धुळे : शिरपूर तालुक्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी पुढाकार घेण्यात येईल आणि अरुणावती नदीवर बंधारे बांधण्यास मान्यता देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. धुळे जिल्ह्यामध्ये गेल्या दीड वर्षात तब्बल ४० हजार कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक आली असून, भविष्यात धुळे आणि नंदुरबार हे जिल्हे राज्याची प्रमुख औद्योगिक केंद्रे बनतील, असा विश्वासही श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते आज दुपारी स्व. तपनभाई पटेल मेमोरिअल हॉस्पिटलचे उद्घाटन झाले. त्यानंतर आर. सी. पटेल औषधनिमर्ण शास्त्र महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित श्री विलेपार्ले केळवणी मंडळ संचलित विविध शैक्षणिक संस्था, औद्योगिक उपक्रमांचे उद्घाटन व भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाला राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, आमदार शिरीष नाईक, आमदार राघवेंद्र पाटील, आमदार अनुप अग्रवाल, आमदार राजेश पाडवी, आमदार मंजुळा गावित, आमदार आमश्या पाडवी, धुळ्याच्या महापौर माया परदेशी, माजी खासदार डॉ. सुभाष भामरे, डॉ. हीना गावित, शिरपूरचे नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, भुपेशभाई पटेल आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाने विकसित एआय आधारित ई-सुविधा पोर्टलचे लोकार्पण, आयुर्वेदिक कॉलेज, ग्रीकल्चर कॉलेज व फार्मसी कॉलेज, तरडी, आर. सी. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल, निमझरीचे सुदूर यंत्रणेद्वारे उद्घाटन, खर्दे येथील वैद्यकीय महाविद्यालय इमारत, नटवाडे येथील याहामोगा माता मंदिर, क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा स्मारक आणि क्रांतिवीर खाज्या नाईक स्मारक आणि दहिवदच्या मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे भूमिपूजन करण्यात आले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, स्वातंत्र्यानंतरच्या काळात अन्न, वस्त्र आणि निवाऱ्यासोबतच आता शिक्षण, आरोग्य व रोजगार या प्रमुख गरजा बनल्या आहेत. याच त्रिसूत्रीवर भर देत शिरपूरने साधलेला विकास राज्यासाठी दिशादर्शक आहे. एकविसाव्या शतकात उद्योग केवळ पैशावर नाही, तर कुशल मनुष्यबळावर चालतात. शिरपूरमध्ये उभारण्यात आलेल्या अभियांत्रिकी, औषधनिर्माण आणि कृषी महाविद्यालयांमुळे हे शहर आता उत्कृष्ट मानवी संसाधन पुरवणारे मोठे केंद्र बनले आहे. तसेच, मुंबई किंवा पुण्यासारख्या मोठ्या शहरांच्या तोडीचे अत्याधुनिक रुग्णालय आदिवासी भागात उभारून जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य अत्यंत कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. शिरपूर येथे आयटी पार्कसाठी अँकर इन्व्हेस्टर शोधून त्याच्याशी आयटी पार्कबाबत चर्चा करण्यात येईल व आयटी पार्क उभारण्याबाबत प्रयत्न करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

शिरपूर येथे आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारी 'सुपर ५०' योजना त्यांच्यात नवा आत्मविश्वास निर्माण करत आहे. खऱ्या अर्थाने आदिवासी कल्याणाची संकल्पना येथे प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. यासोबतच, जगातील प्रगत देशांना दर्जेदार कापड पुरवणारा वस्त्रोद्योग प्रकल्प आणि 'शिरपूर पॅटर्न'च्या जलसंधारण कामांमुळे दुष्काळी भाग पाणीदार होण्यासोबत परिसराचा विकास झाल्याचा विशेष उल्लेख मुख्यमंत्र्यांनी केला.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, धुळे जिल्ह्याचा आकांक्षीत जिल्ह्यांमधील समावेशानंतरच्या गेल्या दीड वर्षांत जिल्ह्यात तब्बल ४० हजार कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक आली आहे. यात प्रामुख्याने रसायन व अन्नप्रक्रिया क्षेत्रात १ हजार ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक निश्चित झाली असून, केवळ सामंजस्य करार न करता हे उद्योग प्रत्यक्ष उभारले जातील. याशिवाय, दोंडाईचा येथील २५० मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प हरित ऊर्जेच्या दृष्टीने एक मोठा टप्पा ठरणार आहे. महामार्गांचे जाळे, सिंचन व्यवस्था, मुंबई-दिल्ली औद्योगिक पट्टा आणि इंदूर-मनमाड रेल्वेमुळे या भागात एक मोठी व सक्षम औद्योगिक परिसंस्था तयार झाली आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

महसुली जमिनीच्या पट्ट्यांवर मिळणाऱ्या सर्व शासकीय योजना लवकरच वन जमिनीच्या पट्ट्यांवरही लागू केल्या जातील, अशी घोषणा करून यामुळे आदिवासी बांधवांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शिरपूर आणि परिसराच्या सर्वांगीण विकासात आपण तालुक्याच्या पाठीशी एका 'भावासारखे' पूर्ण ताकदीने उभे राहू, अशी ग्वाहीदेखील मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली.

पालकमंत्री श्री.रावल म्हणाले,शिरपूरमध्ये शिक्षण, सिंचन व उद्योग क्षेत्रात मोठे काम उभे राहिले आहे. देशात प्रथमच सुरू झालेली कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रशासकीय प्रणाली व नव्याने सुरू झालेले वैद्यकीय महाविद्यालय जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे. तपनभाई पटेल यांच्या नावाने सुरू झालेले हे अद्ययावत रुग्णालय खान्देशातील लोकांसाठी मोठी आरोग्य सुविधा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



मुख्यमंत्र्यांनी धुळ्याचा आकांक्षित जिल्ह्यांच्या यादीत समावेश केल्याने जिल्ह्याला न्याय मिळाला आहे. जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी नरडाणा-शिरपूर परिसरातील दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गिकेला चालना देण्यासह शिरपूर व धुळे येथील विमानतळांचा विकास, मालवाहतूक केंद्र व सिंचनाच्या सुलवाडे-जामफळ, प्रकाशा-बुराई, अक्कलपाडा यांसारख्या अपूर्ण प्रकल्पांना पूर्ण क्षमतेने चालना देण्यासाठी विशेष निधीची आवश्यकता आहे. जिल्ह्याच्या प्रशासनातील रिक्त पदेही तातडीने भरावीत, अशी मागणी श्री. रावल यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

राज्य शासनाने सर्वसामान्यांसाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवल्याचे ते म्हणाले. लाडकी बहीण योजना, नमो शेतकरी सन्मान योजना व कृषी पंपांना मोफत वीज देण्याच्या निर्णयामुळे महिला व शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारने यापूर्वीही शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली होती व आताही हे शासन जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

वस्त्रोद्योग मंत्री श्री.सावकारे म्हणाले, शिरपूर येथील हे नवे रुग्णालय केवळ शिरपूर किंवा धुळे जिल्ह्यासाठीच नव्हे, तर जळगाव, नंदुरबार व शेजारील मध्य प्रदेशातील रुग्णांसाठीही जीवनदान ठरेल. शिरपूर येथील शिक्षणाचा दर्जा उत्तम असून संस्थांमध्ये प्रवेशासाठी गुणवत्ता निकष काटेकोरपणे पाळले जातात. त्यामुळे विद्यार्थी मोठ्या शहरांत जाण्याऐवजी येथेच शिक्षण घेण्यास प्राधान्य देतात. नगरपालिकेने राबवलेले उपक्रम व निर्माण केलेल्या रोजगाराच्या संधींमुळे तालुक्याचा सर्वांगीण विकास झाला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पंतप्रधानांच्या 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेनुसार राज्याची वाटचाल सुरू आहे. प्रत्येक शहराची व तालुक्याची क्षमता ओळखून तिथे विकासकामे केली जात आहेत, ज्यामुळेच गडचिरोलीसारखा जिल्हा आज देशाचे 'पोलाद केंद्र' म्हणून उदयास येत आहे. प्रशासकीय कामांचा सूक्ष्म पाठपुरावा करून सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम मुख्यमंत्री करत आहेत, असेही श्री.सावकारे यांनी सांगितले.

आमदार श्री.पटेल म्हणाले, शिरपूरमध्ये सर्वसामान्यांना अत्यंत कमी खर्चात आरोग्य सेवा देण्यासाठी १ हजार २०० खाटांचे अद्ययावत रुग्णालय सुरू करण्यात आले आहे. या रुग्णालयाचा फायदा धुळे, नंदुरबार, जळगाव व खंडवा परिसरातील गरिबांना होईल. परिसरातील शेती, शिक्षण, पर्यावरण, पायाभूत सुविधा आणि रोजगार निर्मिती क्षेत्रात झालेल्या प्रगतीचा त्यांनी आढावा घेतला. सुमारे पंधरा ते सतरा हजार तरुणांना वस्त्रोद्योग प्रकल्पामध्ये रोजगार उपलब्ध करून दिला आहे, ज्यामुळे सर्वसामान्य कुटुंबांचे जीवनमान सुधारले आहे, असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात आमदार श्री. पावरा म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्याची विकासाकडे वाटचाल सुरू आहे. त्यांच्याकडे विकासाची दृष्टी आहे. पटेल कुटुंबामुळे शिरपूर तालुक्याचा सर्वांगीण विकास होत आहे. शिरपूर तालुका आदिवासीबहुल आहे. या भागासाठी रस्ते करण्यासाठी वन विभागाच्या अटी शिथिल व्हाव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# एमपीएससी भरतीत 'कौशल्य चाचणी'चा वाद तीव्र; ६३% उमेदवारांवर अन्याय, २७०० पदे रिक्त!

## ३७% उमेदवारांना सूट – माजी सैनिक १५%, दिव्यांग ४%, प्रकल्पग्रस्त ५%, भूकंपग्रस्त २%, अंशकालीन १०%, अनाथ १% जी चाचणी सर्वांसाठी नाही, ती रद्द करा – आजम शेख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (चझडउ) लिपिक व टंकलेखक पदांच्या भरती प्रक्रियेत 'कौशल्य चाचणी'चा नियम वादाच्या केंद्रस्थानी आला असून, या चाचणीमुळे बहुसंख्य उमेदवारांवर अन्याय होत असल्याचा आरोप तीव्र झाला आहे. ३७ टक्के उमेदवारांना सूट देत ६३ टक्के उमेदवारांवरच ही चाचणी बंधनकारक करण्यात आल्याने राज्यभर संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या भरती प्रक्रियेत विविध प्रवर्गांतील उमेदवारांना सूट देण्यात आली आहे. त्यामध्ये माजी सैनिक (१५%), दिव्यांग (४%), प्रकल्पग्रस्त (५%), भूकंपग्रस्त (२%), पदवीधर अंशकालीन कर्मचारी (१०%) तसेच अनाथ (१%) यांचा समावेश आहे. मात्र उर्वरित ६३% उमेदवारांना हीच चाचणी अनिवार्य करण्यात आल्याने समान संधीच्या तत्वालाच धक्का बसल्याची टीका उमेदवारांकडून होत आहे.

२७०० पदे रिक्त; मेगा भरतीवर प्रश्नचिन्ह

२०२३ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या सुमारे ७००० लिपिक-टंकलेखक पदांच्या भरतीतून तब्बल २७०० पदे रिक्त राहिल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. कौशल्य चाचणीमुळे अंतिम टप्प्यात मोठ्या प्रमाणावर उमेदवार अपात्र ठरत असल्याने शासनाच्या 'मेगा भरती' घोषणेलाच तडा गेला असल्याची टीका होत आहे.

जी चाचणी सर्वांसाठी नाही, तीचा उद्देश काय?

या पार्श्वभूमीवर उमेदवार प्रतिनिधी आजम शेख यांनी स्पष्ट भूमिका मांडत म्हटले की,



ज्या चाचणीमुळे हजारो पदे रिक्त राहतात, त्यावर पुनर्विचार करायला आयोगाची हरकत नसावी. जी चाचणी सर्वांसाठी नाही, ती चाचणी घेण्याचा उद्देशच साध्य होत नाही.

त्यांच्या या विधानामुळे वादाला अधिक धार मिळाली असून आयोगावर दबाव वाढत असल्याचे चित्र आहे.

हजारो स्वप्नांचा चुराडा

लेखी परीक्षेत यश मिळवूनही कौशल्य चाचणीत अपयश आल्याने हजारो उमेदवार अंतिम टप्प्यात बाहेर पडत आहेत. वर्षानुवर्षे अभ्यास करूनही नोकरी हुकत असल्याने उमेदवारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

निर्णयाची वेळ; आयोगाकडे लक्ष

महाराष्ट्र लोकसेवा आयोगात नव्याने पदभार स्वीकारलेल्या अध्यक्ष व सचिवांनी या वादग्रस्त चाचणीबाबत तातडीने पुनर्विचार करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. लाखो उमेदवारांचे भविष्य या निर्णयावर अवलंबून असल्याने आयोग काय भूमिका घेतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

एकूणच, 'कौशल्य चाचणी' ही गुणवत्ता तपासण्याचा निकष ठरणार की भरतीतील अडथळा? – या प्रश्नाचे उत्तर देण्याची वेळ आता आयोगावर आली आहे.

# भिमप्रकाश मागासवर्गीय बहुउद्देशिय संस्थेच्या वतीने बसव फुले आंबेडकर यांची संयुक्त जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : भिमप्रकाश मागासवर्गीय बहुउद्देशिय संस्था अक्कलकोट च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक एस टी स्टँड येथे महात्मा बसवेश्वर महात्मा जोतिबा फुले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आला वतीने सर्व प्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून आलेल्या सर्व भिमसैनिक व नागरिकांना जेवण वाटपाचा कार्यक्रम करून समारोप करण्यात आला.




याप्रसंगी ज्येष्ठ विधिज्ञ ऍड. विजय हर्डीकर साहेब नगरसेवक अविनाश मडिखांबे ज्येष्ठ नेते शिवराज मालक बिराजदार युवानेते जोतिर्लिंग मालक स्वामी माजी सरपंच प्रकाश दुपारगुडे माजी सरपंच रमेश बनसोडे संदिप मडिखांबे पत्रकार स्वामीराव गायकवाड पत्रकार राजेश जगताप कामगार नेते सिद्धार्थ बनसोडे युवा नेते संदिप बाळशंकर परशुराम भगळे प्रशांत मडिखांबे ओंकार कांबळे शरणू किणीकर देविदास नडगम नितेश मडिखांबे अजय मडिखांबे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिलामणी दादा बनसोडे संस्थापक खजिनदार विजय भालेराव संस्थापक सहसचिव प्रदिप मडिखांबे संस्थापक उपाध्यक्ष शिवा मडिखांबे संस्थापक सदस्य पुष्पराज मडिखांबे उत्सव अध्यक्ष शिवा नाटिकर उपाध्यक्ष राम सोनकांबळे खजिनदार रतन इंगळे सचिव पोपट बनसोडे गंगाराम वाघमारे अजय इसामंत्री किशोर शिंदे नागेश गायकवाड जय बनसोडे संदेश साबळे पृथ्वीराज चौधरी रवि मुगळे आदी पदाधिकारी, सदस्य यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# तालुक्यात अनुचित दुर्घटना घडू नये याकरीता कलम १६३ लागू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील बंद पडलेल्या पावसाच्या पाण्याचा साठा झालेली शेततळे, दगडखाणी, निर्जन नदी किनारा, तलाव, कालवा, मोठी डबकी व जेथे जेष्ठ नागरिक, छोटी मुले, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी कपडे धुण्यासाठी व पोहण्यासाठी जातात, अशा ठिकाणी दुर्घटना घडू नये यासाठी दिनांक १५ जून पर्यंत २०२६ या कालावधीत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आले आहे.

सन २०२६ मध्ये शाळांना उन्हाळयाच्या सुट्ट्या लागल्यानंतर मुले पोहायला जातात. अशा धोकादायक ठिकाणी कोणी जाणार नाही याकरीता धोक्याच्या सुचनांचा फलक दर्शनी भागात लावावा. तसेच कार्यक्षेत्रातील बंद पडलेल्या पावसाच्या पाण्याचा साठा झालेल्या दगडखाणी, निर्जन नदीकिनारा, तलाव, कालवा, मोठी डबकी अशा ठिकाणांचा शोध घेऊन उक्त प्रमाणे अनुचित दुर्घटना घडू नये याकरीता त्या परिसरामध्ये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (पुर्वीचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४) लागू करणे आवश्यक असल्याने याबाबतचे आदेश तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी सचिन लंगुटे यांनी निर्गमित केले आहेत.

# बालविवाह रोखण्यात निर्भया पथकास यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे,यांनी समाजमाध्यमांवर प्रसिध्द केलेला निर्भया पथकाचा वॉटसप नंबर ९१११२२२६३५२ यावर क्यु. आर. कोड स्कॅन करुन गोपनिय बातमीदारादवारे मिळालेल्या माहितीनुसार पंढरपूर ग्रामीण हद्दीत एक बालविवाह दोन दिवसाने होत असल्याचे गोपनिय बातमी मिळाल्याने निर्भया पथक पंढरपूर यांनी सदर ठिकाणी तात्काळ जावुन चौकशी केली असता सुरुवातीला मुलीचे नातेवाईकांनी मुलगी १७ वर्षाचे असल्याचे मान्य केले, मात्र पोलीस पथकाने अधिक खोलवर चौकशी करुन ती शिकत असलेल्या शाळेतुन तिचे बोनाफाईड प्रमाणपत्र घवून आले असता तिचे वय हे १५ वर्षे ११ महीने दिसुन आले. छापलेल्या लग्नपत्रिका या निर्भया पथकानें ताब्यात घेतल्या व त्यानंतर तो होणारा विवाह तिचे आई वडीलांना समज देवुन रोखण्यात आलेला आहे.



सदर अल्पवयीन मुलीस बालकल्याण समिती, सोलापूर यांचेसमक्ष पुढील कार्यवाहीकरीता हजर करण्यात आले.


तसेच निर्भया पथक, पंढरपूर विभाग, पंढरपूर यांनी पंढरपूर शहर, पंढरपूर तालुका, पंढरपूर ग्रामीण तसेच करकंब पोलीस ठाणे हद्दीतील सर्व जनतेला आवाहन केले आहे की, आपले हद्दीमध्ये, आपल्या नातेवाईकांमध्ये अशा प्रकारचे बालविवाह होत असल्यास पोलीस स्टेशन व निर्भया पथकास संपर्क करावा व यापुढे कोणी अशा प्रकारचे बेकायदेशीर कृत्य करेल अशा लोकांवर प्रचलित कायद्यानुसार अत्यंत कडक कारवाई केली जाईल. तसेच अशा लोकांची गय केली जाणार नाही असेही सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळेयांनीसांगितले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर , सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली निर्भया पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक सुप्रिया यादव ,पोकॉ वाघमारे, पोकॉ सावंत, पोकॉ कुचेकर, पोकॉ टिंगरे, पोकॉ काझी यांनी पार पाडलेली आहे.

# शिवस्फूर्ती प्रगती मंडळ (गोविंदा पथक) तर्फे श्री साईनाथ महोत्सव २०२६ चे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज ; श्री साईनाथ मंदिर, रामनगर (अ), घाटकोपर(प), मुंबई-८६ येथील नावाजलेले शिवस्फूर्ती प्रगती मंडळ (गोविंदा पथक) तर्फे दरवर्षी प्रमाणे यंदा ही श्री साईनाथ महोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी श्री साईनाथ उत्सवानिमित्त बुधवार दि.२९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजता गीत, संकल्पना साईरत्न श्रावण बाळा (भाऊ) तसेच संगीत संयोजक अशोक दादा वायंगणकर यांच्या सुस्वर स्वराने अवघ्या महाराष्ट्राला मुक्तकंठाने गौरवलेली साई पालखी गीते(झाले तुझे दर्शन साई)मराठी हिंदी साई पालखी भजनांचा सुस्वर साई भजन सोहळा आयोजित करण्यात आले असून, दुसऱ्या दिवशी गुरुवार दि.३० एप्रिल रोजी सायंकाळी ६.०० वाजता भव्य साईपालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. आणि शेवटी शुक्रवार दि.०१ मे २०२६ रोजी सकाळी ७.०० वाजता साई अभिषेक केला जाणार असून तद्नंतर दुपारी २.३० वाजता श्री सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली आहे. तसेच नंतर सायंकाळी ७.०० वाजता महाप्रसाद (साई भंडारा) होणार आहे.आणि शेवटी रात्री ८.३० वाजता प्रमुख अतिथी देणगीदारांचा जाहिर सत्कार सोहळा पार पडणार आहे. अशा प्रकारे तीन दिवसीय कार्यक्रम होणार आहे.तरी या भव्य श्री साईनाथ महोत्सवामध्ये सर्व साई भक्तांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष-हरेश धांद्रुत यांच्या वतीने करण्यात आले आहे.




# धुळे जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या ई-सुविधा पोर्टलचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धुळे : धुळे जिल्हा प्रशासनाने एआय आधारित तयार केलेल्या ई-सुविधा पोर्टलचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिरपूर येथील कार्यक्रमात लोकार्पण करण्यात आले.



यावेळी धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, महापौर मायादेवी परदेशी, आमदार अमरिशभाई पटेल, आमश्या पाडवी, राजेश पाडवी, काशीराम पावरा, मंजुळा गावित, राघवेंद्र भदाणे, अनुप अग्रवाल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी धुळे जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या या पोर्टलबद्दल पालकमंत्री जयकुमार रावल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांचे अभिनंदन केले. धुळे जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या एआय आधारित इंजिनमुळे प्रशासनाचा कारभार गतिमान होऊन पारदर्शकता वाढेल. यामुळे लोकांची कामे सुलभ होतील, असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी या पोर्टलची माहिती देताना सांगितले की, मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम, १०० टक्के ई-गव्हर्नन्स, टीसीएच तत्त्वे, तहसील ते मंत्रालय कार्यक्षमता या दृष्टीकोनातून प्रेरणा घेऊन पालकमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाने, जिल्हाधिकारी कार्यालय धुळे यांनी ई-सुविधा हे कृत्रिम बुद्धीमत्ता आधारित जिल्हा व्यवस्थापन पोर्टल विकसित केले आहे. अशा प्रकारचा उपक्रम राबविणारा धुळे हा देशातील पहिला जिल्हा आहे.

## तंत्रज्ञान-सक्षम व पारदर्शक परीक्षा प्रणाली

## सुरक्षितता, न्याय आणि भविष्याभिमुख परीक्षा पद्धतीमुळे पालकांचा व परीक्षार्थ्यांचा दृष्टिकोन भक्कम

# स्वेरीत एमएचटी-सीईटी परीक्षा सुरळीत सुरु




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये एमएचटी-सीईटी २०२६ ही परीक्षा सुरळीतपणे सुरु असल्याचे चित्र दिसून येत आहे. या परीक्षेचे व्यवस्थापन अधिक बळकट करण्यासाठी संगणकांवर आधारित विविध तंत्रज्ञानाचा वापर करून सुरक्षित आणि पारदर्शक परीक्षा प्रणाली राबविण्यात येत आहे. यामुळे परीक्षार्थी व पालक वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र शासनातर्फे विविध अभ्यासक्रमांसाठी आवश्यक असलेली एमएचटी-सीईटी ही परीक्षा राज्यभर घेतली जात असून स्वेरीमध्ये दि. २५ मार्च २०२६ पासून ही परीक्षा सुरु झाली असून ती शासनाच्या संकेतस्थळावर दिलेल्या तारखांनुसार दि. १७ मे २०२६ पर्यंत चालणार आहे. यामध्ये तीन वर्ष व पाच वर्षांसाठी असलेले विधी अभ्यासक्रम (लॉ), इंजिनिअरिंग (पीसीएम), फार्मसी (पीसीबी), मास्टर ऑफ कॉम्प्यूटर ॲप्लीकेशन्स (एमसीए) व बॅचलर ऑफ कॉम्प्यूटर ॲप्लीकेशंन्स (बीसीए) या अभ्यासक्रमांसाठी आवश्यक असलेल्या एमएचटी-सीईटी येथे होत आहेत. कांही अभ्यासक्रमांसाठी सीईटी परीक्षा पूर्ण झाल्या आहेत तर कांही अभ्यासक्रमांच्या परीक्षा अद्याप सूरु आहेत. या परीक्षेमध्ये बॉयलर प्लेट भाषा- पर्याय १ मधून

**महाराष्ट्र सीईटी २०२६ मध्ये तंत्रज्ञान-सक्षम परीक्षा प्रणालीसह नवा मानदंड स्थापित केला आहे. बायोमेट्रिक्सपासून तंत्रज्ञान-आधारित देखरेखीपर्यंत सीईटी २०२६ ने तंत्रज्ञानाद्वारे परीक्षेची पारदर्शकता अधिक मजबूत केली आहे.**

महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेशपरीक्षा कक्षाने सीईटी २०२६ साठी तंत्रज्ञान-आधारित उपाययोजनांचा व्यापक संच अंमलात आणला असून परीक्षा प्रक्रियेची प्रामाणिकता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात वाढवली आहे. ऑनलाईनच्या माध्यमातून आधार कार्ड, अपार कार्ड यांची पडताळणी, चेहरा ओळख (फेशियल रिकग्निशन) आणि बायोमेट्रिक प्रमाणीकरण यांसारख्या प्रगत तंत्रज्ञानामुळे प्रत्येक टप्प्यावर उमेदवारांची मजबूत पडताळणी सुनिश्चित केली जात आहे. याशिवाय ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जात आहे तो प्रत्येक केंद्रीकृत हॉलमध्ये सीसीटीव्ही च्या माध्यमातून देखरेख आणि थेट निरीक्षण केले जात आहे तसेच सर्व परीक्षा केंद्रांवर मानकीकृत प्रोटोकॉल लागू केल्यामुळे सुरक्षित आणि छेडछाडरहित परीक्षा वातावरण तयार झाले आहे. या सर्व उपक्रमांमुळे न्यायतेसह जबाबदारी सुनिश्चित करणारी तंत्रज्ञान-सक्षम प्रणाली निर्माण झाली असल्याचे दिसत आहे. तसेच बॉयलरप्लेट भाषा- पर्याय २ मधून सीईटी-२०२६ ही तंत्रज्ञान-प्रथम परीक्षा प्रणालीकडे झालेली महत्त्वपूर्ण वाटचाल दर्शवते ज्यामध्ये विश्वासार्हता आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी अत्याधुनिक उपायांचा वापर केला आहे. बायोमेट्रिक्स आणि चेहरा ओळख यांद्वारे रिअल-टाईम ओळख पडताळणी, तसेच तंत्रज्ञान-आधारित देखरेख आणि कडक डिजिटल नियंत्रण यामुळे गैरप्रकारांची शक्यता लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. थेट सीसीटीव्ही, केंद्रीकृत मॉनिटरिंग प्रणाली, तक्रार निवारण व आक्षेप नोंदणीसाठी सुलभ डिजिटल प्लॅटफॉर्मच्या सहाय्याने सीईटी परीक्षेची प्रक्रिया अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि विद्यार्थी-केंद्रित झाली आहे. या तंत्रज्ञान-आधारित दृष्टिकोनामुळे सुरक्षितता, न्याय आणि भविष्याभिमुख परीक्षा पद्धतीमुळे पालकांचा व परीक्षार्थ्यांचा या परीक्षेकडे पाहण्याचा दृष्टीकोन अधिक भक्कम झाला आहे. सदरची परीक्षा शासनाच्या वतीने स्वेरीमध्ये सुरळीतपणे सुरु असून शासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच स्वेरीच्या वतीने संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. अंतोष द्याडे, प्रा.रोहित पोरे व संगणक तज्ञ प्राध्यापक वर्ग तसेच प्रा. उत्तम अनसे, प्रा. पोपट आसबे, इतर प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी हे परीक्षा नेहमीप्रमाणे सुरळीतपणे पार पाडण्यासाठी परिश्रम घेत आहेत. विद्यार्थी व पालकांना महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेश द्वाराजवळ परीक्षेसंदर्भात असलेले नियम व अटी सहज पद्धतीने समजावून सांगितल्या जातात. त्यानंतर परीक्षार्थ्यांना संबंधित हॉलपर्यंत पोहोचवले जाते. त्यानंतर पालक वर्ग कॅम्पस मध्ये सर्वत्र असलेल्या झाडांच्या दाट सावलीत तसेच स्वेरीत असलेल्या वातानुकुलीत हॉलमध्ये आराम करतात हे चित्र दिसून येत आहे. स्वेरीने केलेल्या सोई-सुविधांमुळे पालकवर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.

**स्वेरीमध्ये सीईटी परीक्षेच्या निमित्ताने आलो होतो. कन्येला परीक्षा कक्षात सोडल्यानंतर आमची कॉलेज प्रशासनाने कॅम्पसमध्ये चांगली सोय केली होती. कडक ऊन असताना आम्हा पालकांसाठी वातानुकुलीत हॉलमध्ये केलेल्या आरामदायी सोईबद्धल स्वेरी प्रशासनाचे मनपूर्वक आभार. कॅम्पस देखील सर्वोत्तम आहे.**
**– सिद्धेश्वर कोणदे, पालक, सोलापूर.**

## ऋणानुबंध टैलेट २०२६परीक्षेमध्ये जिल्ह्यास्तरीय गुणवंत यादीमध्ये कु. स्वरा निर्मळे हीचे घवघवीत यश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी प्रतिनिधी/संजय चव्हाण : टाकळीवाडी .तालुका ,:-शिरोळ येथील कुमार विद्यामंदिर टाकळीवाडी विद्यार्थिनी कु. स्वरा नामदेव निर्मळे इयत्ता ३ री हिने ऋणानुबंध प्रकाशन भुदरगड तालुका भुदरगड जिल्हा कोल्हापूर यांच्या वतीने राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षा टॅलेंट सर्च २०२६ या परीक्षेमध्ये ऋणानुबंध टॅलेंट सर्च परीक्षा मध्ये जिल्हास्तरीय गुणवंत यादी मध्ये २००/१६२ गुण मिळवून जिल्हास्तरीय गुणवंत यादी मध्ये आपले नाव कोरले आहे. कु.स्वरा हीने हे यश स्वतः अभ्यास करून मिळवलं आहे.लहानपणापासु स्वराला अभ्यासाची आवड होती.घरची परिस्थीती हालाखीची असताना आहे त्या परिस्थितीतीला दोष न देता स्वराने आपल्या बुद्धीच्या जोरावर हे यश संपादन करून आपले व आई वडीलांचे नांव रोषन केले आहे.तीच्या या यशाबद्दल तीचे सगळीकडे कौतुक होत आहे.तीच्या या यशाबद्दल हिचा सत्कार करताना पत्रकार संजय चव्हाण, आशुतोष पवार, महेश वनकुंद्रे, व परिवार यांच्या वतीने करण्यात आला.

# सोलापुरात भाजप देणार 'भीमज्योती'ने अपप्रचाराला उत्तर

## संविधानाच्या मूल्यांचे जतन आणि पालन करण्यासाठी पक्ष कटिबद्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : शहरातील काही घटकांकडून भारतीय जनता पक्षाविरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधानाच्या नावाने चुकीचे नरेटिव्ह पसरवले जात असल्याचा आरोप भाजप शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी केला. या अपप्रचाराला ठोस उत्तर देण्यासाठी आणि समाजात योग्य संदेश पोहोचवण्यासाठी 'भीमज्योती' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तडवळकर म्हणाल्या की, भारतीय जनता पक्ष नेहमीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा सन्मान करत आला आहे. तसेच संविधानाच्या मूल्यांचे जतन आणि पालन करण्यासाठी पक्ष कटिबद्ध आहे. मात्र, काही राजकीय स्वार्थी मंडळींकडून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

'भीमज्योती' उपक्रमाच्या माध्यमातून डॉ. आंबेडकर यांचे कार्य, विचार आणि संविधानाचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. भाजप अनुसूचित जाती मोर्चा प्रदेशाध्यक्ष विश्वजीत गायकवाड यांच्या संकल्पनेतून भीमज्योत नागपूर अकोला नाशिक लातूर सोलापूर मुंबई असा प्रवास करत आहे. या कार्यक्रमातून बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात येणार आहे. तसेच भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनाचे सामूहिक वाचन बुद्ध वंदना करण्यात येणार आहे.

त्यानंतर पुढील कार्यक्रम हेरिटेज येथे संपन्न होणार आहेत. त्यामध्ये भीम शाहिरी कार्यक्रम तसेच बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित एआय चित्रपट प्रदर्शित करण्यात येणार आहे. तमाम सोलापूरकरांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असेही त्यांनी सांगितले.

समाजात ऐक्य, समता आणि बंधुतेचा संदेश देण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.




यावेळी पक्षनेते नरेंद्र काळे महेश बनसोडे, विश्वजीत गायकवाड, प्रवीण कांबळे, राजू माने आदींची उपस्थिती होती.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पंढरपूर तालुका ओबीसी सेल अध्यक्षपदी बाळासाहेब खांडेकर यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व पक्ष वाढवण्यास चांगले काम केल्याबद्दल सोलापूर जिल्हा सरचिटणीस पदी यांची मागील काही दिवसांपूर्वी निवड केली होती आता त्यांना तालुकाध्यक्ष हे शरदचंद्रजी पवार साहेब, हो महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, खासदार दहशिल मोहिते पाटील व अरुण खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात येत आहे.



यावेळी बोलताना आणून तोडकर म्हणाले की बाळासाहेब आपले हार्दिक अभिनंदन सोलापूर जिल्ह्यातून जिल्हा सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार पक्ष काम आपण अतिशय प्रामाणिकपणे केल्याबद्दल आम्ही तुमची आज पंढरपूर तालुका अध्यक्षपदी माननीय देशाचे नेते शरदचंद्रजी पवार साहेब माननीय विजयसिंह मोहिते पाटील साहेब व माननीय खासदार धैर्यशील मोहिते पाटील साहेब मा. आमदार अभिजीत आबा पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आपली निवड करण्यात येत आहे.

आपले हार्दिक हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिरपूर येथे शैक्षणिक व औद्योगिक उपक्रमांचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धुळे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिरपूर येथे 'श्री विलेपार्ले केळवणी मंडळ' संचलित विविध शैक्षणिक संस्थांसह औद्योगिक उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. मुख्यमंत्र्यांनी सर्व प्रकल्पांची पाहणी करून समाधान व्यक्त केले. या प्रकल्पांमुळे शिरपूर परिसरातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळतील आणि परिसराच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी शिरपूर तालुक्यातील दहिवद येथे एस. व्ही. के. एम. कॉलेज ऑफ इंजीनियरिंगचे उद्घाटन केले. त्यांनी नव्या इमारतीची पाहणी केली. महाविद्यालयातील सुविधांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आमदार अमरीशभाई पटेल, माजी आमदार कुणाल पाटील, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होत.

कृष्णा कोटेक्स, डाय हाऊसचे उद्घाटन

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते शिरपूर येथील कृष्णा कोटेक्स व डाय हाऊसचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पालकमंत्री जयकुमार रावल, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आमदार अमरिशभाई पटेल, आमदार आमश्या पाडवी, आमदार राजेश पाडवी, आमदार राघवेंद्र भदाणे, आमदार अनुप अग्रवाल, माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, माजी आमदार कुणाल पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा धरती देवरे आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी कृष्णा कोटेक्सची पाहणी केली. जनक पटेल यांनी उद्योगाची माहिती दिली.

शिरपूर टेक्सटाईल पार्कमधील 'प्रथ कॉटस्पिन' व 'एसेरोला' प्रकल्पांच्या कोनशिलेचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण

शिरपूर येथील टेक्सटाईल पार्कमध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या 'प्रथ कॉटस्पिन प्रायव्हेट लिमिटेड' व 'एसेरोला टेक्सटाईल प्रायव्हेट लिमिटेड' या प्रकल्पांच्या कोनशिलेचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

कोनशिला अनावरणानंतर मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी प्रथ कॉटस्पिन टेक्टाईल पार्क आणि एसेरोला कॉटेक्स टेक्स्टाईल पार्कची पाहणी केली. यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शिरपूर तालुक्यातील खर्दे येथे उभारण्यात आलेल्या श्रीमती अलका देसाई स्कुल ऑफ नर्सिंग अँड रिसर्च सेंटरचे उद्घाटन करण्यात आले.

## रांजणी येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मिरवणूक उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे/खामसवाडी प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील रांजणी येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,महामानव, बोधिसत्व,परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त दि.२३एप्रिल २०२६ रोजी भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचे पूजन गावचे सरपंच राजाभाऊ आगरकर, उपसरपंच अन्सार शेख, पंचायत समिती सदस्य गणेश पवार, उरूस कमिटी अध्यक्ष शफि उल्ला पटेल, तंटामुक्ती अध्यक्ष मतीन पटेल, बीट आमलदार देशमाने साहेब ,प्रदीप ठोंबरे, फेरोज पठाण, प्रवीण गायकवाड, सुरेंद्र बनसोडे, पापा गायकवाड,यांच्या शुभ हस्ते करुन अभिवादन करण्यात आले. सजवलेल्या रथातून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भव्य अशी मिरवणूक मुख्य चौकातून काढण्यात आली होती. ही मिरवणूक ढोल, ताशे, लेझीम पथक, झांज पथक, देखावे, चवदार तळे, भगवान गौतम बुद्ध यांची प्रतिमा असलेले पुतळे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा देखावा, या जयंती उत्सवा मध्ये मुख्य आकर्षण होते. यामध्ये भाषण स्पर्धा, वाचन स्पर्धा, समाज प्रबोधन, डॉ. बाबासाहेबांचे विचार असे अनेक समाजप्रबोधन कार्यक्रम जयंती कमिटीच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. मिरवणूकीत सर्व जाती धर्मातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी गावातील सोसायटी चेअरमन प्रल्हाद गोरे, व्हाईस चेअरमन वाहेद शेख, ग्राम पंचायत सदस्य मुजम्मिल सय्यद, महारुद्र ढवणे, विकास ईटकर, राहुल सौदागर, शरद गोरे, अकबर सय्यद, असलम पठाण, श्रावण सोनपारखे, अण्णासाहेब सोनपारखे, महादेव गायकवाड ,विलास सोनपारखे यांच्या सह समाजबांधव उपस्थित होते. ही मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी जयंती कमिटीतील सदस्य भालचंद्र गायकवाड, विजय गायकवाड, माणिक गायकवाड, विकास गायकवाड, धम्मानंद आचार्य, दत्ता बनसोडे, यांनी परिश्रम घेतले. मिरवणूक शांतते पार पाडण्यासाठी शिराढोण पोलीस ठाण्याचे पोलीस उपस्थित होते.

## देशाच्या प्रगतीमध्ये विधि शिक्षणाची भूमिका महत्त्वपूर्ण : राज्यपाल जिष्णु देव वर्मा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : देशाच्या प्रगतीमध्ये विधि शिक्षणाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज येथे केले.

राज्यपालांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. २५) मुंबई येथे १५ व्या वार्षिक 'लीगल इरा इंडियन लीगल अवॉर्ड्स' समारंभाला सुरुवात झाली, त्यावेळी ते बोलत होते. एसोसिएशन ऑफ इंडियन लॉ फर्म्स आणि लीगल इरा मीडिया ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने स्थापन करण्यात आलेले हे पुरस्कार विधि क्षेत्रातील व्यावसायिक आणि फर्म्सना प्रदान केले जातात. देश आर्थिक महासत्ता बनण्याच्या उंबरठ्यावर उभा असताना, विधी व नियामक चौकटीची ताकद हा निर्णायक घटक ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. भारताची आर्थिक प्रगती, डिजिटल पायाभूत सुविधा आणि आत्मनिर्भर भारतांतर्गत उत्पादन क्षेत्रातील उद्दिष्टपूर्ती या सर्व बाबी आपल्या विधी व्यवस्थेची गुणवत्ता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता यावर अवलंबून असल्याचे राज्यपालांनी सांगितले.




करारांचे मसुदे तयार करणे, वादांचे निराकरण करणे, उद्योगांना सल्ला देणे आणि हक्कांचे संरक्षण करणे या माध्यमातून विधी क्षेत्रातील व्यावसायिक देशाला गुंतवणूक, व्यापार आणि विकासाचे दृष्टीने आकर्षक गंतव्य बनविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात, असेही राज्यपालांनी नमूद केले. असोसिएशन ऑफ इंडियन लॉ फर्म्सने राज्यातील विद्यापीठांशी सक्रिय सहकार्य करण्याचे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले. उदयोन्मुख क्षेत्रांशी सुसंगत, व्यवहाराभिमुख अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी तसेच तंत्रज्ञानाधारित कायदा, नियामक चौकट आणि बदलत्या व्यावसायिक वातावरणाशी सुसंगत शिक्षणासाठी उद्योग-शैक्षणिक सहकार्य अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कायदा फर्म्सनी पुढाकार घेत विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण व उमेदवारीच्या (अप्रेंटिसशिप आणि इंटर्नशिपच्या) संधी निर्माण कराव्यात, असे आवाहन राज्यपालांनी केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा मौलिक अनुभव मिळेल, त्यांची रोजगारक्षमता वाढेल आणि विधी क्षेत्रासाठी सक्षम व भविष्योन्मुख मनुष्यबळ तयार होईल, असे त्यांनी सांगितले.उद्घाटन सोहळ्याला सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती संजय करोल व न्या. उज्जल भुयान, राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, मुंबई उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती मनीष पितळे व न्या. हितेन वेणेगावकर, सर्वोच्च न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायमूर्ती हिमा कोहली, एसोसिएशन ऑफ इंडियन लॉ फर्म्सचे अध्यक्ष निलेश त्रिभुवन, लीगल इरा मीडिया ग्रुपच्या संस्थापिका आकृती रायजादा, राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे तसेच वरिष्ठ वकील, जनरल काउन्सेल्स आणि विधी फर्म्सचे भागीदार उपस्थित होते.

### चिखली तहसीलदार विजय सवडे यांचे पात्र नागरिकांना आवाहन

# शासकीय जमिनीवरील १ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे होणार नियमित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे /चिखली तालुका प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाने राज्यातील गरीब व गरजू कुटुंबांना हक्काचा निवारा मिळवून देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण धोरण जाहीर केले आहे.यानुसार,शासकीय जमिनीवर १ जानेवारी २०११ किंवा त्यापूर्वी झालेली निवासी अतिक्रमणे विशिष्ट अटींच्या अधीन राहून नियमित करण्यात येणार आहेत.चिखली तालुकयातील पात्र नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन तहसीलदार विजय सवडे यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत केवळ राहण्याच्या उद्देशाने (निवासी) केलेली अतिक्रमणेच विचारात घेतली जातील. व्यावसायिक स्वरूपाची अतिक्रमणे यातून वगळण्यात आली आहेत.

क्षेत्रफळ व शुल्क आकारणी:



५०० चौ. फुटांपर्यंत अतिक्रमण पूर्णपणे मोफत नियमित केले जाईल,५०० ते १५०० चौ. फुटांवरील अतिरिक्त क्षेत्रासाठी प्रचलित बाजारमूल्याच्या १० टक्के शुल्क आकारले जाईल, १५०० चौ. फुटांपेक्षा जास्त असलेले अतिक्रमण नियमित केले जाणार नाही, ते निष्कासित केले जाईल. मालकी हक्कनियमित केलेली जमीन 'भोगवटादार वर्ग-२' म्हणून प्रदान केली जाईल. अशी जमीन पुढील ५ वर्षांपर्यंत विक्री किंवा हस्तांतरित करता येणार नाही. संपूर्ण महाराष्ट्र राज्यात एका कुटुंबाला केवळ एकच अतिक्रमण नियमित करण्याची मुभा असेल.

माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, गायरान जमिनीवरील अतिक्रमणांबाबत विशेष खबरदारी घेतली जाणार आहे. भूमिहीन शेतमजूर, अनुसूचित जाती (डउ) व अनुसूचित जमाती (डढ) प्रवर्गातील व्यक्तींची अतिक्रमणे थेट व्यक्तीच्या नावे न करता, ती प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडे वर्ग केली जातील.

अर्ज प्रक्रिया - इच्छुक नागरिकांनी ३१ डिसेंबर २०२६ पूर्वी आपले अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील नागरिकांनी ग्रामसेवक यांच्याकडे, तर नगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी मुख्याधिकारी यांच्याकडे अर्ज करावेत.

पुराव्यासाठी आवश्यक कागदपत्रे (१ जानेवारी २०११ पूर्वीची) मतदार यादीतील नाव किंवा वीज बिल, मालमत्ता कर पावती किंवा ग्रामपंचायत नमुना ८-अ उतारा,अतिक्रमण सर्वेक्षण नोंदवहीतील नोंद किंवा सॅटेलाईट इमेज,यासोबतच चालू वर्षातील रहिवासाचा एक शासकीय पुरावा जोडणे अनिवार्य आहे.

शासनाच्या या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला घरांचा प्रश्न सुटणार आहे. तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांनी विहित मुदतीत अर्ज करून आपल्या निवाऱ्याला कायदेशीर संरक्षण मिळवावे,असे आवाहन तहसीलदार विजय सवडे यांनी केले.तसेच नदीपात्र, नाले,सार्वजनिक रस्ते,वन जमीन आणि धोकादायक क्षेत्रातील अतिक्रमणे कोणत्याही परिस्थितीत नियमित केली जाणार नाहीत,असे चिखलीचे तहसीलदार विजय सवडे यांनी सर्व नागरिकांनी नोंद घेण्याचे आवाहन सुद्धा केले.